।। सा विद्या या विमुक्तये ।।
# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

## Office of the Director,Board of Examinations & Evaluation
Phone: (02462) 229294 website: srtmun.ac.in e-mail: srtmuncoe@gmail.com
srtmundboee@gmail.com

जा.क्र. परीक्षा/संपवमूमं/२०१८—१९/1966 दिनांक : ०१/०१/२०१९ 03

स्मरणपत्र —१

प्रति,
**मा. प्राचार्य**
सर्व संलग्नीत महाविद्यालये
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८—१९ या खरीप हंगामातील Trigger-2 लागू केलेल्या दुष्काळसदृश्य तालुक्यातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत.

संदर्भ :१. मा. संचालक, उच्च शिक्षण यांचे पत्र क्र. उशिसं—२०१८/परीक्षाशुल्क शिष्यवृत्ती/१८६९०, दि. ०५/११/२०१८.
२. या कार्यालयाचे पत्र क्रसंपवमूमं/परीक्षाशुल्कमाफी/२०१८—१९/१५९०, दि. १५/११/२०१८.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. १ नुसार मा. संचालक, उच्चशिक्षण यांनी शैक्षणिक वर्ष २०१८—१९ या खरीप हंगामातील Trigger-2 लागू केलेल्या दुष्काळसदृश्य तालुक्यातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करणेबाबत कळविलेले आहे.

या कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्र. २ नुसार सर्व संलग्नीत महाविद्यालयांच्या प्राचार्यांना हि बाब कळविण्यात आलेली असुन शासन निर्णय क्र. एससीवा—२०१८/प्रक्र८९/म—७, दि. २३/१०/२०१८ मधील तरतुदीनुसार हिवाळी २०१८ करीता परीक्षा शुल्क सादर केलेल्या व दुष्काळसदृश्य Trigger-2 लागू केलेल्या तालुक्यातील रहिवाशी विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काची प्रतिपुर्ती करणेबाबत मा. विभागीय

सहसंचालक, उच्चशिक्षण नांदेड यांचेकडे प्रस्ताव सादर करावा व त्याची एक प्रत परीक्षा विभागास पाठवावी असे कळविण्यात आलेले होते.

तथापि अद्याप केवळ २—३ महाविद्यालयांनीच सदर प्रस्ताव सादर केलेले दिसुन येत आहे. सबब, सर्व संलग्नीत महाविद्यालयांच्या प्राचार्यांना पुनश्च: या पत्राव्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त मा. संचालक,उच्चशिक्षण,पुणे यांच्या पत्रानुसार तसेच विविध शासन निर्णयानुसार सन २०१८—१९ च्या खरीप हंगाम Trigger-2 लागू केलेल्या व हिवाळी २०१८ परीक्षेकरीता परीक्षा शुल्क सादर केलेल्या पात्र विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क प्रतिपुर्तीचे प्रस्ताव दि.१०/०१/२०१९ पर्यंत मा. विभागीय सहसंचालक,उच्चशिक्षण नांदेड यांचेकडे त्वरीत सादर करावेत व अभ्यासक्रमनिहाय परीक्षाशुल्काची एक प्रत परीक्षा विभागास पाठवावी.

परीक्षा शुल्क परवाता प्रस्ताव सादर करण्यासाठी मा. संचालक,उच्चशिक्षण पुणे यांचे वरील संदर्भीय पत्रान्वये मार्गदर्शक सूचना विचारात घेवुन प्रस्ताव सादर करावेत.

सदर प्रस्ताव सादर करण्यास विलंब झाल्यास विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्काची प्रतिपुर्ती होवु शकली नाही तर त्यास केवळ महाविद्यालय जबाबदार असेल,याची नोंद घ्यावी.

आपला,

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहितीस्तव सादर :**

१. मा.कुलगुरु महोदय, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. प्रधानसचिव उच्च व तत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा.संचालक,उच्चशिक्षण संचालनालय, म.रा.पुणे.
४. मा.सहसंचालक,उच्चशिक्षण,नांदेड विभाग नांदेड.
५. मा.कुलसचिव,प्रस्तुत विद्यापीठ.
६. मा.वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.
७. सर्व कार्यालयीन अधिक्षक,परीक्षा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.